महिला मार्गदर्शन केंद्र
सख्य
हिंसा थांबवा

# सख्य महिला मार्गदर्शन केंद्र
स्त्री सबलीकरणातून स्त्री-पुरुष समानता

# हुंकार
वर्ष : ८ वे    अंक: २७ वा    जुलै २०२०



## या अंकात ...
* कोरोना उध्वस्त परिस्थिती व महिला
* कोवीड एकोणीस, स्त्री अधिक कासाविस
* तर तिचे जगणे सुसह्य होईल!
* ती:एक कोरोनायोध्दी
* कोवीड-१९ व स्त्रिया
* Caught... Unaware!!
* त्रैमासिक अहवाल.



* प्रकाशक
शैला क्रॉस्टो
* संपादिका
शालिनी जाधव
* सख्य परिवार *
शैला क्रॉस्टो
नॅटी लोपीस
मेरी वनमाळी
शालिनी जाधव
विद्या पाटील
रुशीला रिबेलो
निता चव्हाण
अरुणा सावंत
पार्वती दादोडा


## कोरोना उध्वस्त परिस्थिती व महिला



कोणतेही संकट पूर्वसुचना देऊन येत नाही म्हणून कठीण परिस्थितीला सामोरे जाण्याची पूर्वतयारी असावी हे कोरोनाने आज साऱ्या जगाला दाखवून दिले आहे. जणुकाही सर्व सुरळीत चाललेले असताना वाघाने एखाद्या प्राण्यावर झडप घालावी त्याप्रमाणे कोरोनाने जगावर आक्रमण केले आहे. काही पूर्वतयारी नसताना युध्दाला सुरुवात झाली आणि हे युध्द आटोक्या बाहेर गेले आहे.

पूर्वी कामानिमित्त कुटूंबातील काही व्यक्ती संपूर्ण दिवस बाहेर असायच्या तेव्हा एकमेकांसाठी वेळ नसायचा. पण आता २४×७ सगळे घरात. अशावेळेला असे निदर्शनास येते की अपुरी जागा, आर्थिक अडचणी आणि इतर ताणतणाव ह्याचा परिणाम जास्त महिलांवर झालेला आढळून येतो. स्त्रियांवरील हिंसा ही एका घरातील, एका जातीतील बाब नाही. संपूर्ण जगभरात दर तीन पैकी एका तरी स्त्रीने तिच्या आयुष्यात हिंसा अनुभवलेली असते. घरेलु हिंसा भारतापुरता मर्यादित नाही तर सर्वत्र अगदी जगभर पहायला मिळते.

कामाची जागा सुरक्षित नाही, पण घर तरी कुठे सुरक्षित आहे. माझं घर सुंदर , माझं कुटूंब प्रेमळ असं वाटतं. कुटूंब म्हणजे जिथे मी आनंदाने राहू शकते, मौज मजा करु शकते. पण ते सगळ्याच्याच नशीबी आहे का ? ह्या संचारबंदीच्या दरम्यान घरेलु हिंसांच प्रमाण अधिक वाढत असताना लक्षात येते. १३ एप्रिलच्या बातमीमध्ये तुम्ही ऐकल असेलच उत्तर प्रदेशामधील एका स्त्रीने नवऱ्याच्या त्रासाला कंटाळून आपल्या पाचही मुलांना गंगेत फेकून दिले. २ ते ८ मार्च या काळात १६६ तक्रारी तर २३ मार्च ते १ एप्रिल ह्या काळात २५७ घरेलू हिंसाच्या तक्रारी दिल्लीतील राष्ट्रीय महिला आयोगाकडे नोंद आहेत. स्त्री घराबाहेरच नव्हे तर स्वत: च्या घरातही सुरक्षित नसते, हे कोरोनाने दाखवून दिलेलं जळजळीत वास्तव आहे.

संचारबंदीमुळे बहुतांश कुटूंबातले सगळेजण घरीच आहेत. अशावेळेला नैराश्याचे पडसाद एकमेकांवर उठताना दिसतात. काही कुटूंबात काम नसल्यामुळे हातात पैसा नाही त्यामुळे चीडचीड आणि वाद वाढले आहेत.


सख्य कार्यालय : सिल्वेस्टर, स्मृती, पहिला मजला, पोलीस चौकीच्यासमोर, कळंब रोड, निर्मळ नाका, नालासोपारा (प.), ता. वसई, जि. पालघर, पिन - ४०१३०४ वेळ - सोमवार ते शनिवार सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.००
मोबाईल - 989031240, Email Id - sakhya_87@rediffmail.com
website : www.sakhyawgc.org, facebook : sakhyawomen's Guidance cell
सख्य ठाणे विस्तारीत शाखा : सिव्हील हॉस्पिटल, ओपीडीच्या समोर, तळमजला, टेंभी नाका, अग्यारी, लेन, ठाणे (प.)
वेळ - सोमवार ते शनिवार सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० वाजता. मोबाईल : 9224642560

मुलांच्या खाण्यापिण्याच्या मागण्या आणि घरातील इतर सभासदांचे चोचले पुरवत असताना महिलेला स्वतः कडे लक्ष देण्यास वेळच नाही. काही घरात घरकाम करणारी बाई येत नसल्यामुळे घरातील सर्व कामे स्त्रीलाच करावी लागतात. त्यामुळे ताण आणि वाद वाढत आहेत. नवऱ्याने स्वतःच टेन्शन दूर करण्यासाठी दारू प्यावी, घरात धुमाकुळ घालावा. पत्नीने त्याचा मुकाट्याने मार खावा याशिवाय तिच्याकडे पर्याय नाही.

लॉकडाऊनमुळे माहेरी किंवा शेजारीही जाऊ शकत नाही. पोलीस संचारबंदीच्या कामात व्यस्त असल्यामुळे ते तक्रार घेत नाहीत. असाही गैरसमज काही पुरुष आणि स्त्रीया ह्याच्यामध्ये निर्माण झालेला आहे.

ह्या महामारीच्या काळात पिडित महिलेला दवाखान्यात जाऊन स्वतः वर उपचारही करुन घेता येत नाहीत. कोरोनाने तिला चुपचाप घरात बसून घ्यायला लावलेलं आहे. वेगवेगळ्या प्रकारचा स्वयंपाक कर, ऑनलाईन मुलांचा अभ्यास करुन घे, ऑफिसचे काम कर, अशा अनेक जबाबदाऱ्या पार पाडून स्त्रिया थकलेल्या आहेत, पण सांगणार कुणाला.

घरेलु हिंसेने पिडित झालेल्या महिलांनाही वाटते की "घर असावे घरासारखे, नकोत नुसत्या भिंती , तिथे असावा प्रेम जिव्हाळा, नकोत नुसती नाती."

**सि. शैला क्रॉस्टो**
**संचालिका**

## ८ मार्च आंतरराष्ट्रीय महिला दिन आणि वर्धापनदिन समारंभ









# कोवीड एकोणीस, स्त्री अधिक कासाविस



अगदी आज सकाळची गोष्ट, ऑनलाईन आलो आणि व्हॉट्सअॅपचे संदेश राजधानी एक्सप्रेस सारखे मोबाईलच्या स्क्रिनवर धावू लागले. तसे आपण झोपेतून जागे होतो तेच मुळात व्हॉट्सअॅप साठी! मैत्रिणीच्या संदेशाने माझे डोळे विस्फारले. “महाविद्यालयात जाते, त्यांनी बोलावून घेतले आहे.” आमच्या महाविद्यालयाने असा काही फतवा काढला नाही या समाधानात प्रातः विधी उरकले. बायकोने बनवलेला चहा ढोसला. गरमागरम दडपे पोहे दाताखाली दडपले आणि मोबाईलमध्ये पुन्हा तोंड खुपसून एकलकोंड्या विश्वात प्रवेश केला .

“जेवण वाढायचे का?” बायकोच्या खवळून विचारलेल्या प्रश्नाला, “हो” इतके साधे उत्तर देऊन ताटावर बसलो.तितक्यात मोबाईल थरथरला. “आज खूप दमले.” तिचा संदेश. जेवण उरकताच तिला उत्तर दिले. “दमणारच! तीन महिने बसून खाल्लेस” प्रकाशाच्या वेगाने तिचा प्रतिसंदेश (कृपया वाचकांनी प्रीती संदेश वाचू नये) “तुझ्या जिभेला काही हाड? बाईच्या जन्माला गेला असतास म्हणजे कळले असते! बाई ग!” संदेश अगदी जिव्हारी लागला. लॉकडाऊन मध्ये महिलांच्या वाट्याला आलेले भोग किती वाढले असतील? माझ्या बायकोकडे बघत बघत मी विचारात डुबलो.

हळूच बायकोला कळू न देता दुसऱ्या एका मैत्रिणीला फोन लावला. (हे खूप वर्षांनी जमते.) आमच्याकडे दुसऱ्या बाईबरोबर बोलण्यास सक्त मज्जाव आहे. (स्त्रीवादी भूमिका दुसरं काय!) त्यात मला खंडीभर मैत्रिणी! नाही म्हणजे स्त्रीवादी लेखन करायचे अथवा लिंगभेद यासारख्या विषयावर लिहायचे तर लेखकाचा भाता मैत्रिणरुपी बाणांनी भरलेला असावा लागतो. त्यातला कुठला बाण वाचकाच्या वर्मी लागेल ते सांगता येत नाही. असे होते बघा, बाईचा विषय निघाला की वाहवत जातो. तर मैत्रिणीला फोन लावला. “काय रे काय चाललय?” अरे म्हटले की पुरुष इतके बायकोला कळते! (भोळी) आणि समोरच्या अग ला कळते माझी बायको जवळच असेल! (हुशार) पलीकडून, “कसले काय, बाहेर कोरोना आणि आम्हा बायकांसाठी घरकाम करुन करुन मरोना!” तिच्या घाईत असलेल्या आवाजावरुन मी अचूक ताडले. ती मुलांना आणि नवऱ्याला जेवण वाढायच्या गडबडीत असणार! “नंतर करतो, असे सांगून मीच ठेवून दिला. बाहेरच्यांची खबरबात घेऊन झाल्यावर म्हटले आता जरा घरातल्या मैत्रिणीला विचारु! “कोरोना”... इतकेच उच्चारले आणि माझ्या बायकोचा स्टोव्हचा भडका उडावा तसा उडाला.“नाव घेऊ नकोस त्या कोरोनाचे! सत्यानाश झाला त्याचा! वाट्टोळे झाले त्या.....!” थांबवले नसते तर शिव्या देत देत बायको चीनला पोचली असती. कोरोनाने सगळ्यांचेच जीवन उध्वस्त झाले आहे. तिला शांत करण्यासाठी थोडे तिच्या कलाने बोललो. तिची समाजाबद्दलची असलेली आस्था पाहून बरे वाटले. तसे मी लगेचच तिला सांगून टाकले. आता मात्र ती चांगलीच उखडली. “बाहेर कोरोनाने काय हाहाकार माजवला आहे त्याच्याशी मला काही देणंघेणं नाही. घरात बसून तुम्ही जो उच्छाद मांडला आहे त्यापेक्षा तो कोरोना परवडला.” आता मला ब्रम्हांड आठवले. ‘एकादशी आणि दुप्पट खाशी’ या लोकोक्ती प्रमाणे कोरोना महामारीच्या काळात सर्वच महिलांना पाचपट काम करावे लागत आहे. सकाळची न्याहारी संपते ना संपते तो पर्यंत दुपारची जेवणाची वेळ होते. मग संध्याकाळचा चहा नाश्ता! थोडी उसंत मिळते ना मिळते तोवरच रात्र अंगावर येते. कामवाली नसल्याने धुणीभांडी करण्याची अतिरिक्त जबाबदारी आहेच.

या तीनही सुखवस्तु कुटुंबातील स्त्रियांना कोरोना (पुरुष) महामारीने इतके त्रस्त केले असेल तर कनिष्ठ मध्यमवर्गीय, कष्टकरी, शेतकरी इत्यादी हातावर पोट असणाऱ्या कुटुंबातील स्त्रियांच्या भोगाला सीमाच उरली नसणार! याची मनोमन खात्री पटली. दुसऱ्या दिवशी भाजीपाला आणायला मुद्दाम बाजारात गेलो. (मी बायकोला मदत केली आहे. वाचकांनी नोंद घ्यावी. सगळे पुरुष वाईट नसतात!) भाजी आणि वाणसामान घेता घेता

भाजीविक्रेती, कोळीण, फुलवाली, फळवाली अशा कष्टकरी महिलांच्या मनाचा कानोसा घेतला. आमच्या रोजच्या भाजीवालीला म्हटले, "ताई सध्या दुकान थोडा वेळ चालू असते मग तुम्हाला आराम असेल ना ?" ताईंना जाम राग आला असावा. मारायला उचलल्या सारखी शेवग्याची शेंग हातात घेऊन त्या उद्‌विग्न स्वरात म्हणाल्या, "अहो प्रोफेसर आराम तुमा पुरुषास्नी ! घरला जाऊन कामाची रास उपसायची हाय !"

रांधा, वाढा उष्टी काढा, स्त्री बिचारी किती कष्टी ! कोरोना महामारीने सर्वांचे जीवन उध्वस्त करुन टाकले आहे. जगभरातील मानव जातीला हादरवून टाकले आहे. श्रीमंत असो वा गरीब सगळेच भयभीत झाले आहेत. पण मला वाटते या महामारीने सगळ्यात जास्त त्रस्त केले असेल तर ते महिला वर्गाला ! तिचा दिवस आधी उगवायचा त्यापेक्षा कदाचित तासभर उशिरा उगवला असेल पण तिच्या कष्टाला सीमाच राहिली नाही, या संक्रमण काळात घाण्याला जुंपलेल्या बैलासारखी ती जुंपली गेली. बाहेर हॉटेल बंद असल्याने घरच्यांच्या जीभेचे चोचले ती घरीच पुरवू लागली. आपल्याला कोरोनाला संपवायचे आहे, घरातील राशन नाही ! अशी एक टिपण्णी देखील वॉटस्ॲप वर धुमाकुळ घालत होती.

घरातील पुरुषवर्गाने भिंतीला तुंबड्या लावायच्या. त्याच्यासाठी रोजच रविवार ! सकाळी सूर्य अंगावर घेऊन त्याने झोपायचे, मेनू सांगायचा, हुकुम सोडायचा. मनमानी करायची. पुरुषांचे चोचले पुरविण्यासाठी तिने मात्र राबराब राबायचे. आपल्याकडे एक म्हण आहे, "घरोघरी मातीच्या चुली" मला वाटते कोरोना महामारीच्या काळात महिलांना जास्त भोगावे लागले. जगातल्या कोणत्याही विषाणूपेक्षा पुरुषप्रधान मानसिकतेचा विषाणू अधिक घातक आहे, हे उठावदारपणे दिसून आले. किचन पासून ते बाजारहाट करण्यापर्यंत सर्व कामे महिलांना करावी लागली. नोकरी, व्यवसाय व उद्योग बंद पडल्याने घरांमध्ये बसणाऱ्या पुरुषांची कुरकुर वाढीस लागली त्याची परिणती मारझोड, धुसफुस, भांडण अशा अंतर्गत कलह निर्माण होण्यात झाली. इथेही महिलांना अधिक भरडावे लागले. महिलावर्ग मोठ्या प्रमाणात घरगुती हिंसेची शिकार झालेला दिसून आला.

आधी तिला स्वतःसाठी थोडीतरी उसंत मिळत असे. तिला तिच्या आवडत्या मालिका बघता येत असतं. आता सध्या तो सुद्धा विरंगुळा नाही. दुपारी वामकुक्षी घेणे या काळात कमी झाले. कामे पटापट उरकून तिची कंबरदुखी बळावली. दुपारच्या मैत्रिणी बरोबरच्या गप्पा रोडावल्या (गप्पांचा विषय समोरच असल्यामुळे !) आणि बरंच काही....

तात्पर्य काय ? कोवीड एकोणीस, पुरुषांपेक्षा स्त्री अधिक कासावीस ! काळ कोणताही असो सुगीचा किंवा संकटाचा. महिलांच्या वाट्याला फक्त भोगच ! कोणत्याही सामाजिक स्तरातील स्त्री असो आणि परिस्थिती कशीही असो. पिसायचे ते फक्त स्त्रीने आणि तिनेच !

पण.... पण हे असे वारंवार का घडते ? स्त्री खरंच सबला झाली आहे का ? कोरोनाने त्रस्त झालेल्या पुरुषाला वठणीवर आणता आले नसते ? सगळ्यांनी कामे वाटून घेऊया अन्यथा मी मास्क न घालता घराबाहेर जाईन आणि कोरोना घेऊन येईन ! अशी धमकी देता आली नसती का ? असो. मला वाटते परिस्थिती आहे तशी स्वीकारण्यात ती धन्यता मानते. म्हणून तिची परिस्थिती बदलत नसावी.

ठीक आहे ! चला तर पुन्हा भेटू नवीन महामारी आल्यावर ! तो पर्यंत तुम्ही अशाच सोसत रहा पुरुष महामारी !


**प्रा. जगदीश अनंत संसारे, मुंबई**

प्रा. सेंट जोसेफ कॉलेज, सत्पाळा.

अभिनय प्रशिक्षक

पथनाट्य मार्गदर्शक

प्रतिक्रियेसाठी : 9819335634 / 8850093708




# त्रैमासिक अहवाल
## मार्च ते जून २०२०

## प्रशिक्षण कार्यक्रम

**महिला दिन :**

* जिल्हा परिषद पालघर आणि एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प अंतर्गत आयोजित आंतरराष्ट्रिय महिला दिनानिमित्त महिला मेळावा तसेच पंचायतराज संस्थेच्या लोकप्रतिनिधी प्रशिक्षण कार्यक्रमात खार्डी, पारोळ येथे घरगुती हिंसा प्रतिबंधक कायदा २००५ तर पोमण येथे "सोशल मिडियाचा परिणाम व कायदा" आणि चंद्रपाडा व पाणजू येथे "नेतृत्वगुण विकास" या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच जुचंद्र महिला मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या महिला दिनाच्या कार्यक्रम "लिंगभाव संचेतना " याविषयी तर ठाण्यातील नेहरु नगर मधील महिला मंडळाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात "सर्वांसाठी समानता व समानतेसाठी सर्वजण" या अनुषंगाने मार्गदर्शन करुन महिलांचे खेळ, गाणी घेतली तसेच बक्षीस वितरण करण्यात आले.

**घरगुती हिंसा आणि कोविड - १९**

कोविड १९ च्या संक्रमण काळात लॉकडाऊन आणि सोशल डिस्टंन्सींग चे पालन करत प्रथम संस्थेच्या सहभागींकरीता झुम (zoom) मिटींग द्वारे वेबीनार (Webinar) मार्फत "घरगुती हिंसा आणि कोविड १९ आपत्ती प्रतिसाद" या विषयावर सख्यच्या ॲड. विद्या पाटील यांनी मार्गदर्शन केले.

**संविधान मूल्य आणि तत्वे :**

ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयातील नर्सिंग स्टाफ तसेच विद्यार्थिनींकरीता संविधानाची तत्वे संविधानाने दिलेले अधिकार याविषयी चर्चा करण्यात आली.

**गटबांधणी :**

नर्सिंग स्टाफ आणि विद्यार्थिनींकरीता ठाणे सिव्हिल हॉस्पिटलमध्ये "गटबांधणी" याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

**कामाच्या ठिकाणी महिलांची होणारी लैंगिक हिंसा :**

या विषयी सेंट जोसेफ कॉलेज सत्पाळा आणि ज्ञानमाता सदन, तलासरी येथील सर्व कर्मचारी वर्गाकरीता अंतर्गत तक्रार निवारण समिती मार्फत आयोजित कार्यशाळेत कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारी लैंगिक हिंसा, त्याचे प्रकार, कायदेशीर तरतूद, केसेस हाताळण्याची पध्दत ह्या विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

## विशेष कार्यक्रम

**वर्धापन सोहळा:**

"एक समाज जग - एक सक्षम जग" हे ब्रीद घेऊन दिनांक २२ फेब्रुवारी २०२० रोजी जीवन विकास मंडळ व सख्य महिला मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने "३३वा वर्धापन सोहळा व आंतरराष्ट्रीय महिला दिन "साजरा करण्यात आला. "घरगुती हिंसा" या विषयांवर निर्मला निकेतनच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य तसेच जनजागृती पर नृत्याविष्कार सादर केले . मा. मृदुला सावंत - समुपदेशक आणि वस्तीस्तर विकास अधिकारी -BMC रुग्णालय ह्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

वस्तीतील किशोर मुलींनी पारंपारिक नृत्य सादर केले तर, महिलांनी जाणीव, जागृती गीते सादर केली. "हुंकार" ह्या स्मरणिकेचे तर निर्मला निकेतनच्या विद्यार्थ्यांनी "सख्य" च्या कार्यावर आधारीत तयार केलेल्या डॉक्युमेंन्टरीचे विमोचन करण्यात आले. सख्यच्या गतवर्षीच्या कार्याचा अहवाल सादर केला गेला तसेच करमणुकी करीता स्पॉट गेम देखील घेण्यात आले. त्याद्वारे कार्यक्रमाची रंगत वाढविण्यात आली. तसेच ह्या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून जीवन विकास मंडळाच्या उपाध्यक्षा आग्नेस डाबरे यांनी आर्थिक सबलीकरणातून महिला सक्षमीकरण या विषयांवर मार्गदर्शन केले.

**शैक्षणिक सहल :**

निर्मला निकेतन कॉलेज ऑफ सोशलवर्क च्या विद्यार्थ्यांनी

वस्तीतील मुलांच्या गटांकरिता वसईच्या ऐतिहासिक किल्ल्यात शैक्षणिक सहल आयोजित केली, सहलीसोबत विविध खेळ, गाणी घेऊन मनोरंजनात्मक कार्यक्रमासोबतच बक्षिसेही देण्यात आली. तसेच "चांगला स्पर्श व वाईट स्पर्शाबद्दलही "माहिती दिली.

**विदेशी अभ्यासकांची भेट :** सख्यचे कार्य, कार्यपध्दती आणि लिंगभेद विरहित समाज निर्मिती करीता येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने "युनिवर्सिटी ऑफ हेरात, अफगाणिस्तानच्या प्राध्यापकांची सख्य ला भेट.

**कर्मचारी कौशल्यवृध्दी पशिक्षण कार्यक्रम :** गुजरातमधील भरुच जवळील राजपीपला सोशल सर्विस सोसायटी या ठिकाणी सख्यच्या कर्मचारी वर्गाने भेट देऊन संस्थेची कार्य, कार्यपध्दती, सामाजिक चळवळ, आदिवासींचे हक्क, अधिकार तसेच कायदेशीर तरतूद यांसोबतच संस्थेचे ऐक्य, मानवी प्रतिष्ठा, समानता आणि समान न्याय ह्या उददेशांसकटच गावांतील सदस्यांच्या अनुभव कथनातून अभ्यास करण्याचा प्रयत्न केला.

कोवीड-१९ च्या संक्रमाणातून ऑनलाईनद्वारे वेगवेगळ्या संस्थांनी आयोजित केलेल्या झूम मिटींगद्वारे वेबीनार द्वारे घरगुती हिंसा, लिंगभेद, कामाच्या ठिकाणी होणारी लैंगिक हिंसा, बालकांचे अधिकार, शिक्षण पध्दती आणि सध्याच्या काळात येणाऱ्या अडचणी, बाललैंगिक शोषण तसेच सायबर क्राईम यासारखे मार्गदर्शन पर चर्चासत्रामध्ये सहभाग घेऊन आपली वैचारिक प्रगल्भता वाढविण्याचा प्रयत्न सख्यच्या कर्मचारी वर्गामार्फत करण्यात आला.

## कोवीड १९ - आपत्ती प्रतिसाद

जगभरात कोवीड-१९ ने घातलेले थैमान, भारतात वाढत चाललेले संक्रमण, त्यामुळे येणाऱ्या समस्या दिवसेंदिवस अधिकाधिक बिकट होत आहेत. पण एक सामाजिक संस्था आणि सामाजिक बांधीलकी लक्षात घेत "सख्य" जे सामाजिक सुरक्षा आणि अंतर राखत काही विशेष कार्यक्रम राबविले.

✻ वसई न्यायालयातील सर्व कर्मचारी, वकील तसेच न्यायाधिश यांना संस्थेमार्फत मास्क तसेच सॅनिटायझर वाटप करण्यात आले.

✻ भादाळे वाडा, शिवशंकरपाडा तसेच गास डोंगरी मधील मुलींच्या गटांना सैनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले.

✻ कोवीड १९ - जागतिक आपत्ती आणि लॉकडाऊन या काळात जगातील मंदी, बेरोजगारी आणि उत्पन्नाचे साधन नाही अशा परिस्थितीत उपासमारींची वेळ येऊ नये याकरीता सख्य संस्थेमार्फत मुंबई रिस्पॉन्स व वसईतील काही संस्था च्या मदतीने एक हजारांपेक्षा जास्त कुटूंबियांना अन्नधान्यांचे वाटप करण्यात आले.

✻ कोवीड १९ - आपत्तीच्या काळात प्रतिबंधात्मक पध्दत म्हणून लॉकडाऊन शासनामार्फत राबविले गेले पण त्यांचा परिणामी बहुतांश महिलांना घरगुती हिंसाचाराला बळी पडावे लागले, त्यामुळे महिलांविषयी काम करणाऱ्या संस्थाकडे घरगुती हिंसाचाराच्या अधिकाधिक केसेस या काळात दाखल होऊ लागल्या परंतु लॉकडाऊन असल्यामुळे संस्थादेखील अशा महिलांना मदत करण्याकरीता समुपदेशनाव्यतिरिक्त इतर काही करु शकत नव्हती. शिवाय पोलिसांना देखील या काळात सुरक्षेच्या कार्याव्यतिरिक्त इतर अनेक कार्यात गुंतले असल्याने ते देखील फारशी मदत करु शकत नव्हते. म्हणूनच इतर संस्थाच्या मदतीने सख्यने ही पुढाकार घेत "मला बोलायचं आहे" म्हणून १०० नंबर हेल्पलाईन सुरु करण्यात यश मिळवले. इतर संस्था तसेच वर्क फॉर इक्वालिटीच्या अंतर्गत राबविलेले ऑनलाईन वेबीनारमध्ये सख्यच्या वस्तीपातळीवरील महिला व मुलींच्या गटाने उपस्थिती दाखवून एकंदरीत लिंगभेदावर आधारीत महिलांच्या प्रश्नांचा उहापोह केला.

✻ लॉकडाऊनमुळे अडकून बसलेल्या मंजुरांना खिचडी शिजवून वाटप करण्यात आले.

✻ गावी परतणाऱ्या मजुरांना तसेच प्रवाशांना प्रवासात उपयोगी पडतील अशी औषधे, बिस्किट आणि पाणी यांचे वाटप करण्यात आले.

✻ आयुष मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सुचविलेल्या होमोपेथीक गोळ्यांचे वाटप इतर संस्थाच्या मदतीने वस्तीपातळीवर करण्यात आले.

✻ "चारी" या नेटवर्कींगच्या माध्यमातून कोवीड १९ संक्रमणकाळात महिलांच्या हिंसाचारावर आधारीत तयार करण्यात येणाऱ्या डॉक्युमेंटरी करीता सख्यच्या समुपदेशकांचा सहभाग घेण्यात आला.

# Caught.... Unaware!!!



COVID19 has brought the whole world to its knees. Corona virus or COVID-19 which was first identified in Wuhan, China is now a pandemic globally. Most parts of the world are under complete lockdown to curb and contain the spread of the highly contagious disease. As per the World Health Organization (WHO), COVID-19 has so far infected 6, 140, 934 people and has claimed 373, 548 lives globally. 216 countries or territories or areas have been affected so far by the deadly virus. In India there are more deaths not due just to the virus but due to unplanned lockdowns which have crippled the life of people, especially the poor. As government around the world try to slow the spread of the novel coronavirus, India has locked down its entire population including about 176 million people who struggle to survive on $ 1.90 a day or less. Modi's order allows Indians out of their homes only to buy food, Medicine or other essentials. No going to work. No School. No going back to their home towns. India's handling of the lockdown and the ever-spreading virus is a test for the developing world, offering their poorest citizens into even worse hunger and further destitution.

"Every state, every district, every lane, every village will be under lockdown" for three weeks, Prime Minister Narendra Modi told the nation on Mrach 24, giving India four hours' notice to prepare. "If you can't handle these 21 days, this country and your family has gone back 21 years."

Sakhya, an organization that works for gender quality took a call to respond to the situation created following the lockdown. As families started to leave and travel in the most terrible conditions on their way home, we managed to procure some food, water and electral powder to sustain their physical forces for at least some part of the way.

The National family health survey showed that in case fo Domestic Violence (DV) 85.3% of violence is physical and 87.5% sexual violence perpetrated more by the husband than other perpetrators. According to the data from the National Commission for Women, it shows that there is a steep rise in cases of Domestic Violence (D.V) during the lockdown.

We also responded to checked the women help line. immediate need that women being 24 hours present in the house, makes her an easy target for violence. Today deu to lockdown she connot go out and get any kind of remedy. There is no privacy no safety. Her vulnerability has increased during the lockdown since there is none other service available. So we took the initiative to check whether the helpline 181 is functioning and to our surprise is was defunct though advocated with other Network NGO's to have a special helpline in the state 'Mala Bolayche Ahe' (I want to speak) The provision was also made to use No. 100 for domestic violence cases.

Awareness on Domestic Violence was created while distributing the rations. The cases by telephone were dealt with in an integrated approach with the help of the police to lodge the complaint.

Sicne existing Shelters did not have quarantine facilities, one fo the survivors had to spend 13 days of lockdown in a neighbour's house with the assistance of police and on the 14th day with the help of the protection officer we were able to send her to Alibaug in Raigad district which is a 4-5 hours drive. There was another case where the husband left her with no food and money after her mother came. He had run away and blocked her cell number. We provided her emotional help as well as rations. Her mother had come from UP to see the situation, so she had to back and with the help of the Tehsiladar the block level administration helped us to send her to Lalitpur, UP.

While doing the relief work at village level Sakhya had Gender sensitive sessions with 10 communities of women headed families, widows, single women, survivors of DV and families without ration cards, migrants who were given priority. The organisation also raised funds to provide biscuits for children, ration kits including lentils, and sanitary pads for adolescent girls and women. We also reached out to pregnant and lactating mothers and to those who do not possess ration cards. understanding the difficulties of adolescent 1000pkts of Sanitary Napkin were provided.

**Advocacy :** Sakhya along with the Network NGO's like "WE Action", Legal Aid-Jindal Global Law School, Mumbai have promoted action so that the Government be pressurised to Declare the services for Violence Against Women as essential services and provide protection officers and police personnel during an emergency.

This effort is being supported through the legal aid network from Delhi too.

**Conclusion :**

Along with other Government organisations Sakhya reached out to ease the pain of the people who were caught unaware by the Lockdown. Not only has the COVID-19 pandemic affected men and women differently, it has also affected unequally placed women differently. Therefore, only an approach that recognises the special needs and rights of marginalised and excluded people can have a meaningful and lasting impact on the wellbeing of all the people concerned.

**Sr. Natty Lopis**
**Asst. Director, Sakhya**

# तर तिचे जगणे सुसह्य होईल !



कोरोना व्हायरसने अवघं जग भयकंपीत झालंय. जगावर राज्य करु पाहाणारे आणि स्वतः ला महासत्ता म्हणू पाहणाऱ्या देशांनी या अदृश्य व्हायरसपुढे हात टेकलेत. कोणत्याच राष्ट्राला लॉकडाऊनची अपरिहार्यता टाळता येईना. परिणामतः जागतिक आयात निर्यातीवर मर्यादा आल्या आहेत. मेडिसीन पासून ते अनेकविध अत्यावश्यक आणि तत्सम महत्वाच्या वस्तुंचा तुटवडाही बाजारपेठांमध्येही जाणवतोय. लघू, मध्यम आणि मोठ्या उद्योगधंद्यांचेही शटरडाऊन झालंय. अदृश्य स्वरुपातील व्हायरसने संपूर्ण दुनियेच्या चक्राचा वेग मंदावून टाकलाय.

भारतालाही या परिस्थितीला सामोरं जावं लागतंय. एकापाठोपाठ एक असे लॉकडाऊनवर लॉकडाऊन लादले जात आहेत. जवळपास एकशे तीस कोटी लोंकसंख्येला पूर्वीप्रमाणे मुक्तपणे वावर करता येणं अशक्य होऊन बसलंय. लोकजीवन संपूर्णपणे बदलून गेलंय. भारतीय माणूस लॉकडाऊनमध्ये अडकलाय. या स्थितीला सुमारे शंभरहून अधिक दिवस होत आलेत. त्यामुळे इथला व्यापार उद्योगही ठप्पच झालाय. एक दिवस जर भारत बंद राहिला, तर त्या एका दिवसाचे नुकसान भरुन काढावयास साधारणपणे महिना जावा लागतो. आता तर शंभर दिवसही लॉकडाऊनने ओलांडलेत. एवढ्या दिवसातलं बिघडलेलं अर्थगणित कसं दुरुस्त होणार किंवा ते कसे ट्रॅकवर येणार, हे एक भारतापुढे मोठे आव्हानच आहे.

लॉकडाऊनमुळे भारतीय लोकसमुहातील जो गरीब, कष्टकरी, मजूर ज्यांचे हातावर पोट आहे त्यांच्या हालअपेष्टा आणि कुंचबणा पराकोटीची होत आहे. स्त्रियांना तर यातना, वेदनांचा जो भोगवटा वाट्याला आलाय तो तर मन हेलावून टाकणारा असाच आहे. वेगवेगळ्या संकटाना, त्रासाला सामोरे जाताना स्त्रियांची दमछाक होतेय. या लॉकडाऊनच्या काळात कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रमाणाचा आलेख वाढल्याचे दिसतोय. या शंभर दिवसांत कुटुंबातील कर्त्या स्त्रीवर कामाचा अतिरिक्त ताण येऊन पडला आहे. कुटुंबातील सदस्यांच्या म्हणजेच मुले, नवरा किंवा सासूसासरे यांच्या डिमांडनुसार सर्वांच्याच खाण्यापिण्याच्या गरजा तिला पूर्ण कराव्या लागत आहेत. त्यात काही चुकभूल झाली तर त्यावरुन उफाळणाऱ्या वादंगाला तिला सामोरे जावे लागत आहे. अनेक स्त्रिया मारहाणीच्या बळी ठरत आहेत. खरंतर शारीरिक मारहाणीपेक्षा मानसिक होणारा त्रास, घुसमट ही त्याहून फार भयंकर आहे. मात्र कुटूंबात असल्याने निमुटपणे सर्व सहन करण्याशिवाय तिच्यापुढे काहीच पर्याय उरत नाही. त्यात काम करणारी (वर्क फ्रॉम होम) स्त्री असेल तर तिला खूपच कसरत करावी लागत आहे. ऑफिसमधून येणारे फोन कॉल, मोबाईलवर येणारे मेसेज या आणि अशा कारणास्तव त्या स्त्रीला कुटूंबातून विचारले जाणारे प्रश्न या साऱ्या प्रकारामुळे येणारे मानसिक दडपण याचा अप्रत्यक्षपणे तिच्या सर्वप्रकाराच्या आरोग्यावर परिणाम होताना दिसतोय. तद्द्वत मानसिक आणि शारीरिक स्वास्थ ढासळलेलं आपणास पहायला मिळते.

या लॉकडाऊनमध्ये स्त्रियांच्या व्यथांची चर्चा करत असताना कोणत्याही सामाजिक योजनेच्या लाभार्थी नसणाऱ्या वेश्यांच्या यातनांच्या कथेचाही इथे विचार व्हायला हवा. कारण लॉकडाऊनच्या काळात सगळ्यात जास्त हाल कोणाचे झाले असतील तर वेश्या व्यवसाय करणाऱ्या समुहातील कुटूंबाचे. कारण यांचा जो व्यवसाय आहे ते व्यक्तीच्या संपर्कात आल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. कोरोनाने तर माणूस माणसापासून दूर केला असताना आणि शारीरिक अंतराची सीमारेषा घातली असताना या स्त्री समुहाची (वेश्यांची) वाताहात काय झालीय, याचा अंदाजही करवत नाही. कोरोनाने मरण्यापेक्षा हातातोंडाची भेट होऊ न देता या स्त्रियांची जी जगण्याची प्रतारणा केलीय ती दुर्लक्षून चालणार नाही. एकंदरीत फिजिकल डिस्टंसिंगच्या परिस्थितीत या स्त्रियांच्या उदरनिर्वाहाचा, रोजीरोटीचा यक्ष प्रश्न निर्माण झालाय. लॉकडाऊनने त्याची दाहकता आणखी

वाढवलीय. हे जरी खरं असलं तरी मुळात उदरनिर्वाहासाठी त्यांनी अशा पद्धतीचे म्हणजे देह विक्रीची काम करुच नये यासाठी काय करता येऊ शकते, याचा विचार होणे महत्वाचे आहे.

कोरोना हा व्हायरस विमानातून आला असला तरी त्याचा परिणाम जमिनीवर राहणाऱ्या उपेक्षित, वंचित, गरीब, कुटूंबावर जास्त प्रमाणात झालेला आहे. वेश्या त्यात मोठ्या प्रमाणावर भरडल्या गेल्या आहेत. त्यांचं जगण्याचं भयावह वास्तव हे खरेतर न पटण्यासारखं आणि सहन न होण्यासारखे आहे. वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या प्रश्नावर अनेक सामाजिक संस्था काम करताहेत. अशाच एका संस्थेतील एका मैत्रिणीकडून मिळालेली माहिती अशी, सरकारची रेशनींग सेवा या स्त्रियांच्याकडे रेशन कार्ड नसल्याने त्यांना उपलब्ध होऊ शकलेले नाही. बऱ्याच स्त्रियांची मुले सामाजिक संस्थेच्या सहकार्यातून आश्रमशाळेत असतात. ती सर्व मुले लॉकडाऊनमुळे आता त्यांच्या जवळ आलेली आहेत. त्यामुळे त्यांचा खाण्याचा प्रश्न अधिक बिकट झाला आहे. काही संस्था, काही लोक वेश्या वसाहतीत धान्यवाटपाचे इव्हेंट करताहेत तर, काहींनी मानवतावादी दृष्टिकोनातून जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा केलाय. पण मला इथे असे म्हणायचे आहे,की ही जी मदत दिली गेली आहे ही तात्पुरत्या स्वरुपाची मदत आहे. तेव्हा, इतर स्त्रियांना ज्या सोयी सुविधांचा लाभ मिळत आहे अगदी तसाच वेश्यांनाही तो मिळायला पाहिजे.

समाजकार्याचे शिक्षण घेत असताना मला वेगवेगळ्या वंचित समूहाबरोबर काम करण्याची संधी मिळाली. मी ज्या सामाजिक संस्थेमध्ये ट्रेनिंग साठी होते त्या संस्थेनें वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या मुलांच्या शिक्षणासाठी एक टास्क दिला होता. ज्या लाभार्थीना शिक्षणासाठी स्पॉनसरशिप द्यायची आहे. त्यांची माहिती जमा करण्यासाठी अशा वस्तीत जाऊन सर्वेक्षण करायचे होते. माझ्यासोबत गोव्याची एक इंटर होती. आम्ही दोन्ही संस्थेच्या मदतीने ग्रँटरोड इथे रेड लाईट एरियामध्ये गेलो. तिथे काही महिला आम्हाला भेटल्या. एक स्त्री म्हणून जगत असताना किती भयावह संकटाना त्यांना सामोरे जावे लागते याची वेदनादायी मालिकाच त्यांनी आम्हाला ऐकवली. त्यांची फसवणूक आपल्याच जवळच्या माणसांकडून कशी झालेली असते, या व्यवसायासाठी त्यांना कसे प्रवृत्त केले जाते, चांगल्या हसत्याखेळत्या कुटूंबातून तोडून त्यांना कुंटणखाण्यापर्यंत कसे पोहचवले जाते आणि मग तिथून पुढचा प्रवास वगैरे वगैरे हे सारंच मन आणि काळीज पिळवटून टाकणारी अशीच त्यांची दर्दभरी कहाणी होती.

मुळात स्त्रीला आपले शरीर विकून चरितार्थ करावा लागणं, ही कल्पनाच पिळवटून मनाला वेदना देणारी आहे. तेव्हा स्त्रीच्या अशा वेदनादायी जीवनाकडे पाहताना खूपच संवेदनशीलतेने पहावे लागणार आहे. तिच्या वाट्याला हे जगणं का आले. कशासाठी तिला ही वाट पत्करावी लागली, या अणि अशा प्रश्नांच्या खोलात गेले की मग नेमक्या कारणापर्यंत पोहचणं शक्य होईल. कोणी म्हणेल पोटासाठी, कोणी अय्याशी साठी तर कोणी आणखी काहीही म्हणेल. मुद्दा हा म्हणण्याचा नाहीच. स्त्रीचे स्त्रीत्व पैशात ओरबडून घेणं हे कितपत योग्य आहे, प्रश्न या मुद्द्याचा आहे. वेश्या व्यवसायाच्या संबधी मतप्रवाह आहेत. कोणी म्हणतंय याला कायदेशीर मान्यता द्या तर कोणाचा याला तीव्र विरोध आहे. जे मान्यता द्या असे म्हणताहेत तो विशिष्ट वर्ग आहे जो की त्या वर्गसमुहातील स्त्री या व्यवसायात कुठे दिसत नाही. जे तीव्र विरोध करताहेत त्यांचे म्हणणे असे की गरीब, उपेक्षित आणि भाकरीविना तडफडणाऱ्या वर्गाची जो की या व्यवसायात आहे. त्याची यातून सुटका करावी आणि इतर स्त्रियांप्रमाणे त्यांच्या जीवनाला चांगली दिशा द्यावी वगैरे वगैरे.

एकंदर, लॉकडाऊन काळातच नव्हेतर कायम स्वरुपात स्त्री आणि तिच्या सर्वप्रकारच्या प्रश्नांकडे गांभीर्यपूर्वक पहायला हवे. तरच तिचे जगणं तिच्यासाठी सुसह्य होईल. अन्यथा केवळ स्त्री सबलीकरणाचा आणि सक्षमीकरणाचा डांगोरा पिटत राहणे ही भारतीय स्त्रीत्वाची घोर फसवणूक ठरेल !

**प्रा. पूनम गायकवाड**

**स्त्री चळवळीच्या अभ्यासिका, मुंबई विद्यापीठ.**

B.A., M.A.,M.S.W., M.PHIL., NET., PH.D. (SCHOLAR)

# ती : एक कोरोनायोद्धी

जगभरात आरोग्यसेवा असो की सामाजिक सेवा क्षेत्र यामध्ये काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण ७०% आहे. नॅशनल सॅम्पल सर्व्हेनुसार भारतातील आरोग्य क्षेत्रातील वेगवेगळ्या श्रेणींचा विचार केल्यास, नर्सेस आणि सुईणी यांचेच प्रमाण ८८.९% इतके आहे. म्हणजे या क्षेत्रात तर स्त्रियांचेच वर्चस्व अधिक आहे. मंदीच्या फटक्यात पहिल्यांदा इंडस्ट्रीजवर गदा येते. महिला मात्र शेती, शिक्षण, आरोग्य हॉस्पिटॅलिटी आणि सेवा क्षेत्रात काम करत असतात. त्यामुळे त्यांना झळ कमी बसत आहे. परंतु या विषाणुच्या उद्रेकाचा पहिला परिणाम स्त्रियांनाच भोगावा लागणार आहे. इतकेच नाही तर स्त्रियांना या आजाराचा संसर्ग होण्याची शक्यताही अधिक आहे.

जगभर या काळात घरातून काम करण्याचे धोरण (वर्क फ्रॉम होम) वाढत आहे. आणि जवळपास सगळ्या शाळांना देखील सुट्या दिल्या आहेत. जणू उन्हाळी सुट्टया आधीच सुरु झाल्यात आणि त्या लांबत चालल्यात. परंतु यामुळे घराची काळजी वाहणाऱ्या व्यक्तीवरील ताण वाढतो आहे. साधारणतः अनेक घरात अशी काळजी वाहणाऱ्या स्त्रियाच असतात. लॉकडाऊनच्या काळात मुलांच्या शाळांना सुट्या दिल्याने नोकरदार महिलांवर घरातून काम करण्याबरोबरच मुले व वयोवृद्धांची जबाबदारी पडली आहे. महिलांवर पुरुषांच्या तुलनेत घरातल्यांची काळजी करण्याची अधिक जबाबदारी असते ज्याचे त्यांना पैसेही मिळत नाही. त्यांच्यावर ही जबाबदारी वाढलेली दिसते.

दुसरा महत्त्वाचा बदल म्हणजे पुरुषांनी घरकामाच्या जबाबदाऱ्या उचलणं. असे लक्षात येतंय की जोडप्यांमध्ये १० टक्के जोडपी अशी आहेत ज्यांच्या नवरा-बायकोच्या जुन्या भुमिकांमध्ये बदल झालाय. उदाहरणार्थ बायको आरोग्य क्षेत्रात काम करते तर नवरा आयटीमध्ये . अशात नवऱ्याला घरात राहून काम करणं शक्य आहे, पण बायकोला नाही. त्यामुळे बायका आता दिवसरात्र बाहेर राहून काम करतेय तर नवरा घरात राहून घरातल्या जबाबदाऱ्या पार पाडतोय आणि मुलांकडे लक्ष देतोय. लॉकडाऊनमध्ये सतत घरात असणाऱ्या पुरुषांनाही घरकामाचं महत्त्व कळतंय. समानतेच्या दृष्टीने हे महत्त्वाचं पाऊल आहे.



देशातील काही राज्यांमधून मान्यता प्राप्त सामाजिक स्वास्थ कार्यकर्त्या (आशा) आणि अंगणवाडी सेविकांना त्यांच्या-त्यांच्या परिसरातील कुटुंबाची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यांनी घरोघरी जाऊन नागरिकांनी कोव्हिड-१९ पासून बचाव करण्यासाठी कोणती जबाबदारी घ्यावयाची आहे, याची माहिती द्यायची आहे. परंतु एका वृत्तानुसार अशा कर्मचाऱ्यांच्या संघटनेने केंद्र सरकारकडे, यासाठी अत्यावश्यक असलेली साधने पुरवण्याची मागणी केली आहे. सध्या त्यांच्याकडे अशा अत्यावश्यक सुरक्षा साधनांचा अभाव आहे. देशात सार्वजनिक आरोग्य कर्मचारी म्हणजेच आशा (ASHA) म्हणून काम करणाऱ्या दहा लाख महिला आहेत तर अंगणवाडी सेविका म्हणून काम करणाऱ्यांमध्ये १.४ दशलक्ष स्त्रिया आहेत.

भारतात अधिकांश महिला या घरात काम करणाऱ्या आहेत. तसेच स्वयंरोजगार करणाऱ्या महिलांचे प्रमाणही मोठे आहे. बिगर-शेती क्षेत्रात काम करणाऱ्या ३१.७% महिला या घरातून काम करतात. घरातून काम करणाऱ्या या स्त्रियां स्वयंरोजगार करतात, म्हणजेच त्यांना इतर कंपन्या जशा आपल्या कर्मचाऱ्यांना महामारीमुळे इतर फायदे देऊ शकतात तसे फायदे मिळवणे शक्य नाही. पीएलपीएस (PLPS) ने बिगर शेती क्षेत्र आणि पुरक शेती क्षेत्र (जसे की पशुपालन, मत्स्यपालन, मासेमारी आणि शेतीला पूरक ठरतील असे व्यवसाय ) यातून अनौपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचा आकडा निश्चित करण्याचे ठरवले. त्यांच्या सर्वेक्षणानुसार, महिला कामगारांमध्ये अनौपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण ५४.८% आहे. म्हणजेच कोव्हिड-१९ मुळे स्त्रियांवर विचित्र परिणाम होणार आहे. कारण, एकतर या काळात त्यांचे काम सुटण्याची शक्यता अधिक आहे आणि शिवाय त्यांना कंत्राटीपध्दतीने दिल्या जाणाऱ्या पगारी रजांच्या धोरणाचा लाभ देखील मिळणार नाही. आता जगातले हजारो बिझनेस वर्क फ्रॉम होमच्या वेगवेगळ्या सिस्टम्स स्वीकारत आहेत.

येत्या काळात या व्यवस्था काम करण्याचं मुख्य साधन बनतील. यामुळे महिलांना घर आणि काम यांच्यात समतोल साधणं शक्य होईल मुलांकडे लक्ष देण्यासाठी हजारो महिला आपली नोकरी सोडतात. पण जर त्यांना घरातून काम करणं शक्य झालं तर त्यांना आपल्या करिअरचा बळी द्यावा लागणार नाही. कोरोना विषाणूमुळे जगातील सर्वच देशांची अर्थव्यवस्था डबघाईला आली असून, त्यामुळे बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. अमेरिकेत तब्बल चौदा लाख कर्मचारी बेरोजगार झाले आहेत. मात्र, यात महिलांचे नोकऱ्या जाण्याचे प्रमाण पुरुषांपेक्षा जास्त आहे.

कोव्हिड-१९ मुळे झालेल्या लॉकडाऊनमुळे घरगुती हिंसाचार आणि बाललैंगिक शोषण वाढल्याच्या घटना समोर येत आहेत. एकट्या भारतात राष्ट्रीय महिला आयोगाकडे येणाऱ्या घरगुती हिंसाचाराच्या तक्रारींमध्ये दुपटीने वाढ झाली आहे. घरात अडकलेल्या महिलांना घरगुती हिंसाचार आणि काहीवेळा लैंगिक अत्याचाराचा सामना करावा लागत आहे. जगभरात हीच परिस्थिती आहे. लॉकडाऊनच्या काळातच घरगुती हिंसाचाराच्या मोठ्या पोलिस नोंदी झाल्या. अशाच घटना आता अनेक देशांमध्ये लॉकडाऊन पुकारल्यानंतर दिसू लागल्या आहेत. महिलांवरील अत्याचाराची सर्वाधिक प्रकरणे घडणाऱ्या उत्तर प्रदेशात लॉकडाऊनच्या काळात महिलांवरील हिंसाचाराच्या एवढ्या घटना घडत आहेत की पोलिसांनी पीडित महिलांसाठी खास हेल्पलाइन सुरु केली आहे. नोकरी, व्यवसाय, उद्योग बंद पडल्याने घरांमध्ये पुरुष बसून राहिले आहेत. त्यांच्या सततच्या कुरकुरी व त्रास महिलांना होत असल्याचे चित्र आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष रेखा शर्मा म्हणतात, की लॉकडाऊनच्या काळात महिलांवरील शाब्दिक व शारीरिक हल्ले खरोखरी वाढले आहेत. दिवसभर पुरुष घरात बसलेले असतात, त्यांना आलेले वैफल्य ते घरातल्या महिलांवर काढत असतात. हा ट्रेंड पंजाबमध्ये अधिक दिसून येत आहे. या राज्यातून तक्रारीही खूप येत आहेत. कोरोनामुळे पुकारलेल्या लॉकडाऊनमध्ये देशातल्या आर्थिक परिणामांची सर्वाधिक चर्चा होताना दिसत आहे. कोरोना विषाणूची लागण महिलांपेक्षा पुरुषांना अधिक झाल्याचे आकडेवारीनुसार कळत आहे पण या साथीचे मानसिक व्रण महिलांवर अधिक पडत आहेत, हे नाकारता येत नाही. महिलांच्या बाबतीत नेहमीच आर्थिक भेदभाव केला जात आहे, त्याचे आरोग्यावर होणारे परिणाम अनेक पिढ्या महिला भोगत आहेत. आता त्यात कोरोना महासाथीची भर पडत आहे. या महासाथीत केवळ महिलाच नव्हे तर मुलांवरही अत्याचार वाढत असल्याचे यूएस नॅशनल क्राईम एजन्सीचे म्हणणे आहे. भारतात तशी आकडेवारी अद्याप जाहीर झालेली नाही पण हे वास्तव नक्कीच भयावह असू शकते.

प्रसुतीकाळात घ्यावयाची काळजी आणि कौशल्यपूर्ण आणि तातडीच्या प्रसुतीसेवेचा अभाव यामुळे कोव्हिड-१९ च्या काळात माता मृत्युदराचा वाढता दर पाहता, भारतासाठी सुसज्ज राहणे अधिक आव्हानात्मक आहे. NFHS-4 च्या आकडेवारीनुसार भारतात फक्त २१% महिलांनाच प्रसुती कालीन आरोग्य सेवेचा पूर्ण लाभ मिळतो. सार्वजनिक रुग्णालयात प्रसुती झाल्यास जननी सुरक्षा योजने अंतर्गत आर्थिक लाभ मिळालेल्या मातांचे प्रमाण फक्त ३६.४% आहे. कोरोनाच्या या जागतिक महामारीच्या विरोधात सुसज्ज होत असताना, समाजातील कमकुवत घटकांसोबतच गर्भवती स्त्रियांच्या गरजा लक्षात घेऊन त्यांची पूर्तता करणे अत्यावश्यक आहे. याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे.

कोरोनाचा विषाणू जगभरात धुमाकुळ घालतो आहे. त्याचा संसर्ग गरीब-श्रीमंत असा भेदभाव करीत नसला, तरी तो स्त्री -पुरुष असा भेदभाव करताना दिसतो आहे. अमेरिकेत मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये पुरुषांचे प्रमाण महिलांच्या दुप्पट आहे. पश्चिम युरोपमध्ये दगावलेल्यांमध्ये पुरुषांचे प्रमाण ६९ टक्के आहे.

महामारीला तोंड देण्यास सज्ज होताना त्यामध्ये स्त्रियांच्या ज्ञानाचा आणि त्यांच्या अभिव्यक्तीचा समावेश केल्यास ही तयारी अधिक सामर्थ्यशाली बनू शकते आणि या समस्येकडे एका उत्तम-लिंगभाव दृष्टीकोनातून पाहिले जाऊ शकते. कोव्हिड-१९ च्या प्रसाराला मिळणाऱ्या प्रतिक्रियेमध्ये असुरक्षित नागरिक आणि स्त्रियांवर याचा जो वेगवेगळा परिणाम होणार आहे त्याची दखल घेणे गरजेचे आहे.

**- डॉ. नेन्सी विन्सेन्ट डिमेलो.**

(Ph.D, LLB) गास.

# कोव्हिड - १९ व स्त्रिया



खरेतर या महामारीने सगळ्यांनाच उघडे पाडले आहे. सगळे देखावे, बुरखे, फसवी रुपे, सगळे आव व अवसाने.... सगळेच गळून पडत आहे. घराघरात कोंडलेल्या माणसांना एकमेकांची व त्याहून स्वतःची खरीखुरी ओळख होऊ लागली आहे. आपल्या खऱ्या स्वभावाची, माणूसपणाची जाण होऊ लागली आहे. स्वतःच्या मर्यादांची, कमजोरींची समज येऊ लागली आहे. स्वतःची आर्थिक स्थिती, आजवरचे नाते संबध, स्थैर्य व यश यांविषयीचे समज व व्याख्या किती चूक व किती बरोबर होत्या ते लक्षात येऊ लागले आहे. आजवर आपण किती बिनधास्त आणि बेसावध जगत होतो, याचेही भान येऊ लागले आहे. या महामारीने एखाद्या काऊन्सेलरसारखे आपल्या समोर आरसा धरुन आपले खरे स्वरुप आपल्याला दाखविले आहे. अर्थात अधिक चांगले होण्यासाठी स्वतः मध्ये काय बदल करावेत हेही लक्षात आले असले तरीही किती जण खरोखरीच आवश्यक ते बदल करतील हे ज्याचे त्यालाच माहीत. मात्र या महामारीने प्रत्येकाच्या जीवनावर आघाती परिणाम केला आहे आणि अनेक बाबतीत - स्वभावापासून ते खर्च करण्याबाबतीत अनेक बदल करायला भाग पाडले आहे. लॉकडाऊन सुरु होऊन "बिफोर करोना (बीसी)" आयुष्य संपून "आफ्टर करोना (एसी)" च्या काळात आता लोकांना जगण्यासाठी नक्की काय लागते, अत्यावश्यक गरजा कोणत्या व अनावश्यक गरजा कोणत्या याविषयी मोठे आत्मज्ञान सगळ्यांना झाले आहे. किती लोकांनी लॉकडाऊनच्या काळात गाडी, फ्रिज, टिव्ही सारख्या चैनीच्या वस्तू घेतल्या ? सगळेच "सर्व्हायव्हल मोड" मध्ये गेले ना ? खर्चाला जमेल तेथे जमेल तशी कात्री लावली गेली. भविष्याविषयीची भीती वाटू लागली. "आपण, आपले आपल्यासाठीच" असा विचार होऊ लागला. या घरबंदीवान होण्याच्या काळात सगळयांवर विविध प्रकारे विविध परीणाम झाले. लहान मुलांपासून ते वृध्दांपर्यंत सगळेच बंधनात अडकल्याने अनेक गोष्टींपासून वंचित राहवे लागले. नशिब आपले की हातात इंटरनेटसज्ज मोबाईल आहेत. अनेकांना तर मोबाईलने ईमोबाइल केले आणि मुले दिवसभर मोबाईलमध्ये वाहून गेली. त्यात वर्क फ्रॉम होम वगैरे सुरु झाल्याने सगळेच वातावरणच बदलले. करोना व्हायरसने आपली आपल्याशीच बऱ्यापैकी गाठ घालून दिली एवढे मात्र खरे.

"स्त्री जन्मा, तुझी कहाणी" हे उद्‌गार पुन्हा पुन्हा तोंडी यावे अशी आजची दुःखद स्थिती आहे. करोना व्हायरसने आलेल्या कोव्हीड-१९ या महामारीने कधी नव्हता तो जाच स्त्रीयांना सोसावा लागत आहे. असे जगभर चित्र दिसत आहे. याचवेळी स्त्रियांनी शांतचित्त होऊन, अत्यंत गांभीर्याने अनेक महत्वाच्या विषयांवर (उदा. स्वतःचे आर्थिक स्वातंत्र्य टिकविण्यावर, भावभावनांवर) विचार करण्याची व भविष्यातील वाटचालीची दशा व दिशा ठरविण्याचीही वेळ आली आहे. स्त्रियांना स्वतःच्या भावविश्वाचा, नातेसंबंधाचा, कामकाजाचा, करीअरचा, आर्थिक स्वातंत्र्याचा, सातत्याने बजावित असलेल्या विविध भुमिकांचा... अशा अनेक बाबींचा विचार करावा लागणार आहे, आढावा घ्यावा लागणार आहे.

"सर्वस्व तुजला वाहूनी, माझ्या घरी मीच पाहुणी" हे शोकात्म उद्‌गार या काळात अनेक स्त्रियांच्या ओठी आल्याचे दिसून आले, लैंगिक अत्याचार हा तर स्वतंत्रच विषय ठरावा असे दुःखद अनुभव आहेत. बलात्कार म्हणजे काय असतो, हे कळल्याचे अनेक स्त्रीयांनी म्हटले आहे. अनेक जोडप्यात विसंवाद झाल्याचे सर्वत्र ऐकायला येते, भांडणे टोकाला जाऊन घटस्फोटापर्यंत विचार केल्याचे अनेकांकडून कानी येते. अनावश्यक गर्भारपण ही याची एक अशीच नाजूक बाजू आहे. काळ बीसी असो व एसी. स्त्री ही कोणत्याच काळात सुरक्षित नव्हती आणि नाही. "सातच्या आत घरात" म्हणणाऱ्या घरातही स्त्रीयाच नव्हे तर मुलीही सुरक्षीत नसल्याचे विषण्ण करणारे चित्र दिसावे अशा बातम्या ऐकायला वाचायला मिळतात. स्त्रियांना शरीरधर्मासाठी अर्थातच पुरुषांपेक्षा अधिक खाजगीपणा, खाजगी जागा (पर्सनल स्पेस व प्रायव्हसी) लागते. लहानशा घरात सगळेच कोंडले गेल्याने स्त्रियांची, मुलींची मोठीच कुचंबणा झाली.

अनेक लहान घरात माणसे आळीपाळीने कामावर जात असल्याने, अनेकजण कामाच्या ठिकाणी राहात असल्याने घरात गर्दी नव्हती व किमान तरी प्रायव्हसी होती. सगळेच घरी असल्याने मोठीच पंचाइत झाली. मुंबईतून खुराड्यावजा खोलीत राहणारे परप्रांतिय मुंबई सोडून गावी निघण्यामागे हे ही एक कारण होते हे लक्षात घेतले पाहिजे. अनेकांना आपली घरे किती लहान आहेत हे कळले.

आर्थिक स्थिती व संपन्नता वगैरे किती लटकी, फसवी व अनिश्चित आहे तेही कळले. महिन्याकाठी वा दिवसाकाठी नियमीत पगार येत होता म्हणून सगळे आलबेल, सुरळीत होत. श्रीमंत नाही पण सुखवस्तू असल्याची जी जाणीव होती. ती किती फसवी व पोकळ होती त्याची जाणीव प्रखरतेने झाली. अनेकांची बचत संपली व पुढे काय, ही विवंचना आली. दिले घेतलेले उसने वसुल करण्यात कडवटपणा आला. " बायकोच्या पगारावर घरखर्च व नवऱ्याच्या पगारावर घर गाडीचे हप्ते" असा डोलारा होता तो कोसळला नसला तरीही बऱ्यापैकी कोलमडला आणि अचानक खर्चाला कात्री लागणे सुरु झाले, बँकांनी हप्ते पुढे ढकलले तरीही ओढाताण आली, आर्थिक सुरक्षितता फसवी असल्याचे लक्षात आले. बायकांचे "सिक्रेट रिझर्व्स" ही संपले. यातून चीडचीड आली, आरोग्याचे प्रश्न आले, बाहेरच्या करोनाच्या भीतीने सगळे गारठल्यागत झाले. पण यात स्त्रियांची ओढग्रस्तता वाढली. सगळयांचे करता करता ती पिचली. काही चांगले नवरोबा काही मदत करु लागले असले (आपल्या बायकांना किती किती कष्ट करावे लागतात, भांडी घासणेधुणे किती कष्टाचे असते वगैरे व्हॉटस्‌ॲप मेसेजवर बायकांचे कौतुकवजा मेसेज अजूनही फिरत असले तरीही) काही नवरोबा कधी नव्हे तसा बेदरकारपणे आळस दाखवू लागले. "सगळं तुलाच तर करायचंय! " असा समज करुन दिला जाऊ लागला. सगळ्याच घरात हे चित्र नसेलही मात्र स्त्रियांवर कामाचा ताण वाढला. भावनिक ओढाताण वाढली. ज्या स्त्रियांना " वर्क फ्रॉम होम" करावे लागले त्यांना तर घरात घरकाम, सगळे भावनिक ताणतणाव तसेच ऑफिसचे काम यांचा ताण असह्य झाला. या अशा बदलाला सामोरे जायचा अनुभव नसल्याने अनेकांची भंबेरी उडाली.

चार दिवस माहेरी जाणे वगैरे तर दूरच राहिले. त्यात लहान मुले असणाऱ्या आयांना मुलांचे ऑनलाईन शिक्षण पहायचे, घरातली कामे करायची की वर्क फ्रॉम होम करायचे असा पेच पडला आहे. घरात असूनही धावधाव सुरु आहे. त्यात स्त्रीयांच्या आरोग्यावर मोठा ताण आला आहे. अनेक स्त्रीयांना तासनतास कॉम्प्युटर समोर बसावे लागत असल्याने पाठ व कंबरदुखी, मान व डोकेदुखी असे अनेक त्रास सुरु झालेत. बाहेर फिरणे नाही. त्यामुळे ना मोकळी हवा, ना ऊन, ना स्वत:साठी वेळ, ना कसले मनोरंजन. हे कधी व कसे संपणार आहे, याची चिंता तर आहेच. त्यात भरीला जागतिक आरोग्य संघटनेचा इशारा दिलाय की ही तर केवळ सुरुवात असून आपल्याला करोनाबरोबर अनेक महिनेच नव्हे तर वर्षे जगावे लागणार आहे. लॉकडाऊननंतर अनलॉकडाऊन वगैरे सुरु असले तरीही मनात भीती आहेच. अनेक स्त्रियांनी जमेल तो गृहउद्योग करुन दोन पैसे मिळवायचे प्रयत्न केले आहेत.

करोनाचा स्त्रियांवरील परिणाम हा केवळ भारतातच नव्हे तर जगभरात झाला आहे. जगभरातली आकडेवारी पाहाता आरोग्य व विविध सामाजिक सेवा यांच्यात स्त्री कर्मचाऱ्यांचा वाटा ७० टक्क्याहून अधिक आहे. ("काही झाले तरी माझ्या मुलीला नर्स करणार नाही") असे पालक कितीही म्हणत असले तरिही हजारो नर्स व आया असलेल्या स्त्रीया करोनायोध्दा होऊन जीवावर उदार होऊन सेवा बजावीत आहेत. घरालाच नव्हे तर समाजालाच एकत्र ठेवण्याचे काम स्त्रिया आताही करीत आहेत. घरकाम करणाऱ्या स्त्रियांना होममेकर म्हणत असले तरीही आताच्या संकटकाळात त्या होम सेव्हीयर आहेत. अनेक स्त्रियांना काटकसर करुन माहेरी असणाऱ्या म्हाताऱ्या आजारी आई बाबांनाही थोडेफार पैसे देत हातभार लावावा लागत होता त्यांची भावनिक ओढाताण होत आहे. पुरुषांच्या मानाने स्त्रियांची आर्थिक स्थिती फार थोडे अपवाद वगळता कमजोरच असते. जगभर पुरुषांच्या तुलनेत एकाच कामासाठी स्त्रियांना किमान २५ टक्के वेतन दिले जाते. असा अभ्यास अहवाल आहे. जपानसारख्या आधुनिक देशात तर तो सांस्कृतिक शिरस्ताच आहे. स्त्रियांच्या दुय्यम स्थानाचा खरा जाच त्यांना सोसावा लागतो तो अशा संकटकाळात.

करोनाने हे दु:खद वास्तव पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. स्त्री आणि पुरुषांवर अशा आपदांचा वेगवेगळा परिणाम होतो. हे नव्याने सिध्द करायची गरज नाही. नीट डोळे उघडे करुन पाहिले तर दिवसभर भर उन्हात फाटल्या साडीवर चार दोन भाज्या विकत बसलेल्या बायका आपल्या भोवती आजही, आत्ताही दिसतील. या करोनाकाळात स्त्रियांच्या आरोग्यविषयक समस्यांकडे किती गांभीर्याने पाहिले जात असेल बरे ?

या कोव्हीड महामारीने समाजातील लिंगभेदाचे दु:ख वास्तव प्रकर्षाने समोर आले आहे. खरेतर समाजासमोर आरसाच धरला आहे या महामारीने! २०१४-१६ च्या काळातील इबोला असो, २०१५ -१६ चा झिका असो वा आत्ताचा करोना असो; स्त्रियांच्या भोगाचे चित्र अनुभवाने सारखेच आहे. संकटकाळात कुटूंबाला जगवायला, सावरायला नेहमीपेक्षा स्त्रियांना खूप काही अधिक करावे लागते पण ते लक्षात घेतले जातेच असे नव्हे. आपण कालपरवापर्यंत सुखवस्तू असणाऱ्या स्त्रियांविषयी बोलतो पण समाजाच्या नाकर्तेपणामुळे व असंवेदनशील गेंड्याच्या कातडीमुळे वा जाणिवपुर्वक दुर्लक्ष केल्याने अनेक स्त्रियांच्या परिस्थितीची, हालअपेष्टांची साधी दखलही घेतली जात नाही. या महामारीने रोज काही दिडक्या अंगावर फेकून तुडविल्या जाणाऱ्या वेश्यांचे काय हाल झाले असतील, त्याकडे फारसे कोणाचे लक्षच गेले नसल्याचे दिसले. त्यांच्या दुर्दशेविषयी कोणी का बोलत नाही बरे ? म्हाताऱ्या स्त्रियांचे, एकाकी स्त्रियांचे प्रश्न तर फारसे हिशोबात नसतात. संकटकाळात स्त्री पुरुषांपेक्षा अधिक कमजोर ठरल्याने संकटग्रस्त (व्हर्नरेबल) असते. युध्दाच्या, संकटाच्या, दंग्याधोप्याच्या काळात तर स्त्रीला एखाद्या साधनासारखे वापरले जाते हा इतिहासाचा नेहमीचा अनुभव आहे.

यावर्षी युनोच्या स्त्रियांची जागतिक परिषद झाल्याला २५ वर्ष होत आहेत. या परिषदेत स्त्रियांच्या हक्करक्षणाविषयीचा "बिजींग जाहिरनामा व कृती कार्यक्रम" सादर करण्यात आला होता. या करोना संकटाचा मुकाबला करण्यासाठी सरकारने जाहीर केलेल्या योजनांमध्ये कमजोर स्त्रियांसाठी काही विशेष योजना का असू नसे ? काही संवेदनशिलता तरी दिसावी!

स्त्री जेव्हा आर्थिक स्वातंत्र गमविते तेव्हा ती संकटग्रस्त होतेच. या महामारीने अर्थव्यवस्थेची मोडतोड झाल्याने असंख्य, अनेक उद्योगधंदे बुडाले आहेत. त्यामुळे जगभरात ५० टक्क्यांहून अधिक लोकांचे रोजगार बुडाले आहेत. स्त्रियांना या बेरोजगारीचा मोठाच फटका बसणार आहे. मॉल्समधील, शाळेत शिकविण्याऱ्या शिक्षिका... असंख्य नोकऱ्या राहाणार नाहीत. आपल्या वसईत प्री-प्रायमरीला शिकविणाऱ्यांच्या नोकऱ्या संकटात आल्या आहेत. पेजेला देईल तो शेजेला घेईल ही भिषण म्हण स्वातंत्र्याची दशके उलटूनही अजूनही वापरात आहेच. कधी कधी मनात विचार येतो परप्रांतिय मजूरांच्या बायका अपार हालअपेष्टा सहन करुन गावी गेल्या त्यांचे आता काय होईल बरे ? की मुंबईत भले पालिकेच्या शाळेत शिकताना चांगल्या भविष्याची पाहिलेली स्वप्ने आता केवळ आठवणी पुरता राहून त्यांनाही गावच्या वातावरणात कोंडमारा सहन करत नेहमीच्याच मार्गाने जगावे लागेल काय ... त्यांच्यातील किती जणींना बालमजूर व्हावे लागेल. किती जणींना लहान वयात उमलण्याआधीच कोमेजावे लागेल...

संकटे येतात तेव्हा लिंगभेदाने ग्रासलेल्या भारतासारख्या समाजात त्याचा स्त्री व पुरुषांवर वेगवेगळे परिणाम होतात. त्यांचा वेध घेऊन स्त्रियांना विशेष मदत केली जायला हवी. त्यांच्या स्थिती विषयी अधिक संवेदनशीलता समाजाकडे असायला हवी. संकटकाळात एखादा समाज स्वत: च्या स्त्रियांना कसे वागवितो त्यावरुन त्या समाजाची गतिशिलता, महानता समजून येते. ब्रिटीशांच्या राजवटीत आलेल्या साथीच्या रोगांमध्ये याविषयीचे वास्तव आहे.

या करोना काळात "स्त्रीजन्मा तुझी हीच कहाणी " असा विलाप अटळ असला तरीही तो शक्यतोवर कमी करण्याकडे आपला भर राहिल का ? करोनापेक्षा भिषण लिंगभेदाच्या विषाणूने समाजग्रस्त आहे त्यावर लस कधी येईल बरे ? मात्र स्त्रियांनी लिंगभेदाच्या विषाणूविरुध्द प्रतिकारक्षमता वाढविणे हाच उपाय आहे हेच खरे !

अशावेळी "सख्य" सारखी संस्था जे कार्य करते त्याची महती अशा वेळी प्रकर्षाने लक्षात येते व हात वंदन करण्यासाठी जुळून येतात.

**प्रकाश आल्मेडा**
**मो. ८६००१७८८२५**



वस्तीतील गरजुंना अन्नधान्याचे वाटप



शैक्षणिक सहल



महिला मेळाव्यात मार्गदर्शन



राजपिपला सोशल सर्विस सोसायटी, गुजरात अभ्यास दौरा



वस्तीतील किशोरवयीन मुलींना सॅनिटरीपॅडचे वाटप



नर्सिंग विद्यार्थ्यांसोबत कार्यशाळा

सौ. डेलिना लोपीस ह्या "सख्य" संस्थेत मागील १० वर्षापासून लेखापाल या पदावर कार्यरत होत्या परंतु त्यांच्या काही वैयक्तीक कारणामुळेत्या "सख्य "च्या सेवा कार्यातून मुक्त झाल्या आहेत. शिस्तबध्द, निटनेटकेपणा आणि संस्थेच्या हिताच्या दृष्टीने सख्य मध्ये केलेल्या कार्याबद्दल त्यांचे आभार तसेच त्यांच्या पुढील वाटचालीस सख्य परिवाराकडून शुभेच्छा !



# MOST PROMISING COMPANY OF THE YEAR!

# RBL BANK




CNBC TV18 India Business Leader Awards - 2018

**Some Of Our Important Accolades**

| CNBC ASIA | EY Entrepreneur Of The Year | WORLD ECONOMIC FORUM | Business Today | BW BUSINESSWORLD |
|---|---|---|---|---|
| **INDIA TALENT MANAGEMENT AWARD** | **ENTREPRENEUR OF THE YEAR AWARD** | **GLOBAL GROWTH COMPANY AWARD** | **BEST SMALL BANK AWARD** | **FASTEST GROWING SMALL BANK AWARD** |
| India Talent Management Award from CNBC Asia **(2017)** | Vishwavir Ahuja recognized as 'EY Entrepreneur of the Year' in the Financial Services Category **(2016)** | Recognized by World Economic Forum as a 'Global Growth Company' **(2014)** | Business Today-KPMG Study Best Bank-Growth 2012-16 Best Small Bank 2017 **(2012 to 2017)** | Business World Study India's Fastest Growing Small Bank **(2013 to 2017)** |

RBL Bank is almost 75 year old, but only 7 years young in our current avatar. During this period, the bank has grown by almost 40 times in size and over 50 times in profits. We have put together a best in class institution to deliver best in class banking services, grounded on the principles of strong governance, best professional standards and an ethical value system. We are overwhelmed by the support and good wishes from all our stakeholders.

**Thank You!**

*apno ka bank* | RBL BANK

**Call:** 1800 123 8040 | **Visit:** www.rblbank.com | **Write:** customercare@rblbank.com
**CIN** L65191PN1943PLC007308